मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 21 एप्रिल 2025 | पान- 1

# बचत गटांच्या महिलांकडून मालमत्ता कर बिलांचे वाटप!

## मालमत्ताधारकांनी सहकार्य करावे : पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातही महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. तरी बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख १५ हजार ८६३ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सर्वच बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. महिला बचत गटातील महिलांच्या माध्यमातून मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपवली आहे. बिल वाटप करण्यात येणाऱ्या महिलांना महानगरपालिकेच्या



### मालमत्ता कर भरण्याची ऑनलाइन सुविधा

» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ ची मालमत्ता कर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील. तसेच मालमत्ता कर बिले ३० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बिले भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत मिळणार आहे.

> बचत गटांच्या महिलांमार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू झाले आहे. यामुळे बचत गटांच्या महिलांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी देखील बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे.
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका मालमत्ता कर विभागाचे बिल वाटप महिला बचत गटांच्या महिलांमार्फत करण्यात येत आहे. ३० जून २०२५ पर्यंत कर भरल्यास मालमत्ताधारकांना विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा.
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# नळजोडणीवर अनधिकृत विद्युत पंप जोडणाऱ्यावर दंडात्मक कारवाई

## पिंपरी चिंचवड पालिकेच्या भरारी पथकाची कारवाई; 60 जणांचे विद्युत पंप ताब्यात

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील नळजोडणीवर अनधिकृतपणे थेट विद्युत मोटर,पंप जोडणाऱ्या ६० विद्युत पंप धारकांवर पिंपरी चिंचवड पालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत कारवाई करण्यात आली. महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या सूचनेनुसार नळजोडणीवर अनधिकृत विद्युत पंप जोडणाऱ्यावर कारवाई करण्यासाठी भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. या अंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

शहरातील ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या चिंचवड, बळवंतनगर, शिवनगरी, साईराज कॉलनी, ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या रहाटणी परिसरातील अमृतवेल कॉलनी, फ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या मोरे वस्ती भागातील भावेश्वरी व श्री कुंज कॉलनी, सांगवी परीसरातील गणेशनगर, राजारामनगर, समतानगर, पवनानगर तसेच दापोडी परिसरातील गुलाबनगर, पवार वस्ती एसएमएस कॉलनी, नव भारत नगर या परिसरात पाणी पुरवठा विभागाच्या भरारी पथकाने ही कारवाई केली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पाणीपुरवठा विभागामार्फत शहरातील पाणीपुरवठा सुरळीत राहावा, यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी वापरात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. त्यामुळे मनपाच्या नळजोडीवर थेट विद्युत मोटर,पंप जोडल्यास उंच भागात पाणी कमी दाबाने पोहोचत आहे आणि नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. महानगरपलिका



नियमावलीतील नियम क्र. १५ नुसार, मनपाच्या अधिकृत नळजोडीवर थेट विद्युत मोटर,पंप जोडण्यास मनाई आहे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर मनपा कठोर कारवाई करीत आहे.

चिंचवड मधील बळवंतनगर, शिवनगरी,साईराज कॉलनी परिसरातील अनधिकृत पणे थेट नळाला जोडलेले २१ विद्युत पंपांचे संच पाणी पुरवठा व ब क्षेत्रीय कार्यालयामार्फत जप्त करण्यात आले. या कारवाई वेळी उपअभियंता प्रविण धुमाळ,कनिष्ठ अभियंता ऋषिकेश गेंगजे , रघुनाथ शेमले, तुषार सव्वासे, साधना ठोंबरे उपस्थित होते.

> सध्या उन्हाळ्याच्या दिवसात नागरिकांनी पाणी जपून वापरावे. तसेच नळजोडणीला अनधिकृत पद्धतीने मोटार जोडून पाणी उपसा करणाऱ्यांवर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी जाऊन वापरा व अनधिकृत पद्धतीने पाण्याचा अपव्यय करू नका. अन्यथा महानगरपालिकेच्या कडक कारवाईला सामोरे जावे लागेल.
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, महापालिका

> उन्हाळ्याच्या दिवसात देखील पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिकांना आवश्यक पाणी पुरवठा करत आहे. अनधिकृत विद्युत पंप जोडणीमुळे पाणी पुरवठा करण्यास अडथळा येत आहे. यामुळे नळ जोडणीवर अनधिकृत पद्धतीने विद्युत पंप जोडणाऱ्यावर पाणी पुरवठा विभागाच्या वतीने दंडात्मक कारवाई करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.
> - अजय सूर्यवंशी , सह शहर अभियंता, पाणीपुरवठा, विभाग

# पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील रस्त्यांची होणार डागडूजी...

## शहरातील 50 किलोमीटरच्या रस्त्यांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रस्त्यांचे दुरुस्ती केली जाणार आहे,

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळा सुरू होण्यापूर्वी करण्यात येणाऱ्या शहरातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी (प्रिव्हेंटिव्ह मेंटेनन्स) महापालिकेच्या पथ विभागाकडून १५ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. शहरातील ५० किलोमीटरच्या रस्त्यांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रस्त्यांचे दुरुस्ती केली जाणार आहे, पुढील काही दिवसांमध्येच या कामासाठी निविदा काढल्या जातील, अशी माहिती महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितली.

शहरातील रस्ते सुसाट करण्यासाठी पथ विभागाकडून वेगाने कामे केली जात आहेत. शहरातील रस्त्यांची महती राष्ट्रपती कार्यालयापर्यंत पोहचल्यानंतर पथ विभागाला जाग आली आहे. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवारांनी देखिल पालिकेचे कान टोचले होते. पालिकेने १५ रस्ते सुसाट केल्यानंतर १७ रस्त्यांची कामे हाती घेतली आहे. या रस्त्यांशिवाय इतरही रस्ते चकचकीत करण्याची निर्णय पालिकेने घेतला असून पथ विभाग कामाला लागला आहे. यामध्ये नव्याने रस्ते तयार करणे तसेच खराब झालेल्या रस्त्यांची डागडुजी करणे, या कामांचा समावेश असतो. रस्त्याची कामे करण्यासाठी पथ विभाग दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. पावसाळ्यानंतर शहरातील रस्त्यांवर खड्डे पडतात. तर अनेक रस्त्यांवर पावसाचे पाणी साठल्याने त्या रस्त्यांची अवस्था बिकट होते. रस्त्यांवरील खडी, डांबर, बाहेर येते. याचा त्रास वाहनचालकांना तसेच रस्त्याने जाणाऱ्या पादचाऱ्यांना देखील सहन करावा लागतो. पावसाळ्यानंतर गेल्या काही वर्षांमध्ये रस्त्यांच्या दुरावस्थेच्या तक्रारी वाढल्या होत्या. त्यामुळे रस्त्यांची डागडुजी केली जाणार असून पावसाळ्यात खड्डे पडणार नाहीत, याची काळजी घेतली जाणार आहे.



### शहरातील 50 किलोमीटर रस्त्यांवर मायक्रो सरफेसिंगची कामे

» पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर मायक्रो सरफेसिंगची कामे करण्याचा निर्णय पथ विभागाने घेतला आहे. यासाठी निविदा काढून ही कामे पूर्ण केली जाणार आहेत. शहरातील ५० किलोमीटर रस्त्यांवर म्हणजे साधारण तीन लाख ८० हजार चौरस मीटर क्षेत्रफळावर पावसाळा सुरू होण्यापूर्वी मायक्रो सरफेसिंगची कामे पूर्ण करण्याचे नियोजन पथ विभागाने केले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तुम्ही खर्चात रस्त्यांवर ही कामे करण्याचा पालिकेचा प्रयत्न असल्याचे पावसकर यांनी सांगितले.

### दोन भागांसाठी 15 कोटी रुपयांच्या निविदा

» पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील कोणत्या रस्त्यांवर हे काम करायचे आहे, हे निश्चित करण्यात आले आहे. मायक्रो सरफेसिंगची कामे करण्यासाठी शहराचे पूर्व आणि पश्चिम असे दोन भाग करण्यात आले आहे. प्रत्येक भागासाठी साडेसात कोटी रुपयांची निविदा असे दोन भागांसाठी १५ कोटी रुपयांच्या निविदा काढण्यात येणार आहेत. या कामासाठी महापालिकेच्या इस्टिमेट कमिटीच्या बैठकीत देखील मान्यता देण्यात आली आहे. मायक्रो सरफेसिंग चे काम केल्याने पुढील तीन ते चार वर्षात रस्त्याला खड्डे पडणे, रस्ता खराब होणे, असे प्रकार घडत नाहीत. यापूर्वी देखील पुणे महानगरपालिकेने मायक्रोसर्फेसिंग या तंत्रज्ञानाचा वापर करून काही रस्ते तयार केले आहेत. हे रस्ते आजही सुस्थितीत असल्याचे पावसकर यांनी सांगितले.

> रोड असेट मॅनेजमेंट सिस्टीममाध्यमातून सर्वेक्षण करून पुणे शहरांमध्ये पावसाळ्यापूर्व विविध रस्त्यांवर ज्या ट्रीटमेंटची आवश्यकता आहे, त्याचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यानुसार साधारण पन्नास किलोमीटर रस्त्यांवर म्हणजे साधारण ३.८० लाख चौरस मीटर क्षेत्रफळावर फक्त लो- कॉस्ट ट्रीटमेंटच्या आधारे प्रिव्हेंटिव्ह मेंटेनन्स साध्य करण्यासाठी रस्ते निश्चित करण्यात आलेले आहेत. मायक्रो सरफेसिंग ही अत्यंत कमी दरामध्ये होणारी एक उत्कृष्ट अशी ट्रीटमेंट आहे. मायक्रो सरफेसिंगचे काम केल्याने तीन ते चार वर्षात रस्त्याला काहीही खड्डे किंवा पॅच खराब होणे असे प्रकार घडत नाहीत. पावसाळ्यापूर्वी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर मायक्रो सरफेसिंगची कामे केल्यानंतर पावसाळ्यात रस्त्यांवर खड्डे पडणे, रस्त्यांची दुरवस्था होणे, खडी बाहेर येणे असे प्रकार होणार नाहीत. कमी खर्चात हे काम होणार असल्याचे रस्तेही सुस्थितीत राहतील आणि खर्चही कमी होणार आहे.
>
> - प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग.

# पुण्यातील बाबा भिडे पूल वाहतुकीसाठी पुढील दीड महिने बंद राहणार

## डेक्कन जिमखाना या मेट्रो स्टेशनच्या बाजूला असलेला पादचारी पुलाचे काम सुरु असल्यामुळे हा पूल बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

आधीच वाहतुक कोंडीच्या गराड्यात अडकलेला पुणेकरांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. पुण्यातील बाबा भिडे पूल वाहतुकीसाठी पुढील दीड महिने बंद राहणार आहे. मेट्रोच्या डेक्कन जिमखाना या मेट्रो स्टेशनच्या बाजूला असलेला पादचारी पुलाचे काम सुरु असल्यामुळे या ठिकाणी हा पूल बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

मेट्रोच्या कामामुळे आपण दीड महिना बंद राहत असल्यामुळे मेट्रो प्रशासनाकडून क्षमस्व अशी पाटी या ठिकाणी लावण्यात आली आहे. पण रहदारीचा हा संपूर्ण भाग असल्यामुळे पुणे पोलिसांच्या वाहतूक शाखेवर इथे होणारी वाहतूक कोंडी सोडवण्याचे मोठा आव्हान असेल.

पुणे शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या भिडे पुलावर दररोज हजारो गाड्यांची ये-जा होत असते. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील बाबा भिडे पूल वाहतुकीसाठी पुढील दीड महिने बंद राहणार आहे. पुणे मेट्रोच्या डेक्कन जिमखाना या मेट्रो स्टेशनच्या बाजूला असलेला पादचारी पुलाचे काम सुरू असल्यामुळे या ठिकाणी वाहतूक पुढील दीड महिने पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. मात्र कुठलीही पूर्वसूचना न देता अचानकपणे भिडे पूल बंद झाल्यामुळे या ठिकाणी नागरिकांची मात्र मोठी गैरसोय होताना दिसते आहे.

नारायण पेठ, सदाशिव पेठ या भागातून तसेच उपनगरातून हजारोंच्या संख्येने वाहनं याच भिडे पुलावरून दररोज ये-जा करतात. अशातच, भिडे पूल बंद केल्यामुळे आता पुण्यात मोठी वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे.



### नदीपात्रातील वाहतुकीवर मोठा परिणाम

» नारायण पेठ, सदाशिव पेठ असे शहरातील प्रमुख भाग तसेच जे एम आणि एफसी रोड या ठिकाणी जाण्यासाठी याच मार्गाचा वापर केला जातो. तर दुसऱ्या बाजूला उपनगरात राहणाऱ्या नागरिकांसाठी नदीपात्रातील रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे आता त्याचा परिणाम नदीपात्रातील वाहतुकीवर सुद्धा होणार आहे.

# पाण्यासाठी मोजावे लागणार 100 कोटी, चार वर्षांत तिप्पट वाढली रक्कम

## धरणामधून पाणी उचलल्यास महापालिकेला सुमारे 100 कोटीहून अधिक रक्कम जलसंपदा विभागाला मोजावी लागणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहराला मावळ तालुक्यातील पवना धरणामधून पाणीपुरवठा केला जातो. यासाठी महापालिका जलसंपदा विभागाला दरवर्षी कोट्यवधी रुपये अदा करते. त्यातच दरवर्षी जलसंपदा विभागाकडून पाणी वर्ष संपत आल्यानंतर जुलैमध्ये १० टक्के दरवाढ केली जाते. त्यामुळे पुढच्या काही वर्षांमध्ये तीनही धरणामधून पाणी उचलल्यास महापालिकेला सुमारे १०० कोटीहून अधिक रक्कम जलसंपदा विभागाला मोजावी लागणार आहे. पाणी महाग होत असून पाणी पुरवठ्यासाठी महापालिकेला मोठा खर्च करावा लागत आहे. गेल्या चार वर्षांमध्ये जलसंपदा विभागाला द्याव्या लागणाऱ्या रकमेत तीन पटीने वाढ झाली आहे.

शहराला पवना धरणातून ५१० व एमआयडीसीकडून ३०, आंद्रा धरणातून १०० असा ६४० एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात पोहचल्याने हे पाणी पुरत नाही. त्यामुळे गेल्या सहा वर्षांपासून शहरामध्ये एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. यामुळे उन्हाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरिकांच्या तक्रारी येत असतात. सुरळित पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेला मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. त्यामध्येच जलसंपदा विभाग दरवर्षी १० टक्के दरवाढ करत असल्याने पालिकेच्या तिजोरीवर आणखी ताण वाढत आहे. त्यातच जलसंपदा विभाग आणि महापालिकेचा दरावरून वाद आहे. जलसंपदा विभाग औद्योगिक दर आकारत आहे. तसेच नदी प्रदूषण मोठ्या प्रमाणावर असल्याने त्याचाही दंड आकारत आहे. परिणामी, महापालिकेला कोट्यवधींचा भुर्दंड सहन करावा लागत आहे.

पालिकेकडून मंजूर कोट्यापेक्षा सुमारे १०० एमएलडी अधिकचे पाणी उचलले जात आहे. तो दर १ हजार लिटरला २ रूपये २० पैसे इतका करण्यात आला आहे. दंडाची रक्कम धरून पालिकेस वर्षासाठी ७५ कोटीचे बिल जलसंपदा विभागास द्यावे लागणार आहे. एमआयडीसीकडून दररोज ३० एमएलडी शुद्ध पाणी विकत घेतले जात आहे. त्याचा खर्च वेगळा आहे. तर पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाला पाणीपट्टीतून ७६ कोटी ४१ लाखांचे उत्पन्न झाले आहे. याच उत्पन्नात पालिकेला शहरातील जलशुद्धीकरण, पाणी पुरवठा यंत्रणा राबवावी लागते.

आंद्रा धरणातून १०० एमएलडी आणि खेड तालुक्यातील भामा आसखेड धरणात २६७ एमएलडी पाणी महापालिकेसाठी आरक्षित करण्यात आले आहे. त्यासाठी पाच वर्षांत पुनर्स्थापना खर्च म्हणून २७९ कोटी रूपये महापालिकेने जलसंपदा विभागास अदा केले आहेत. सद्यस्थितीत आंद्रा धरणातून नदीपात्रातून पाणी उचलण्यास सुरूवात करण्यात आली आहे. तर तीनही धरणांमधून पाणी उचलण्यास सुरूवात केल्यानंतर पालिकेस १ हजार लिटरसाठी १ रूपया १० पैसे दराने बिल भरावे लागणार आहे. पवना, आंद्रा व भामा आसखेड या तीन धरणातील पाण्यासाठी पालिकेला दरवर्षी सुमारे १०० कोटी रुपये खर्च करावा लागणार आहे.



### नदीची दूरवस्था अन तिजोरीवर ताण

» गतवर्षी जलसंपदा विभागाला भरलेल्या रक्कमेत यंदा दुपटीने वाढ झाली आहे. त्यामध्ये जलसंपदा विभागाने विविध प्रकारचे दंड लावल्याने हा खर्च वाढला आहे. त्यात प्रामुख्याने नदीची स्वच्छता नसून नदीमध्ये सांडपाणी सोडण्यात येत आहे. त्या पाण्यावर प्रक्रिया केली जात नाही. त्यामुळे नदीच्या प्रदूषणामध्ये मोठी वाढ होत आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने कोट्यवधी रुपयांचा दंड महापालिकेला ठोठावला आहे.

### आकडेवारीवर एक नजर

| वर्ष | जलसंपदा विभागाला भरलेली रक्कम |
|---|---|
| » २०२१-२२ – | २० कोटी |
| » २०२२-२३ – | २६.३८ कोटी |
| » २०२३-२४ – | २९.८७ कोटी |
| » २०२४-२५ – | ६०.९६ कोटी |

“ सद्यस्थितीत महापालिका पवना आणि आंद्रा धरणामधून पाणी घेत आहे. त्यासाठी यावर्षी जलंसपदा विभागाला ६० कोटी ९६ लाख रुपये अदा केले आहेत. यामध्ये एमआयडीसीच्या पाण्याचा समावेश नाही. औद्योगिक आणि घरगुती वापर याबाबत महापालिका आणि जलसंपदा विभाग यामध्ये वाद आहे. महापालिका औद्यगिकीकरणासाठी पाणी वापरत नाही.

**- प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग.**

# उद्योगनगरीत कुशल कामगारांची वानवा; परप्रांतीयांना दिलं जात आहे प्रशिक्षण

## कारखान्यांमध्ये होणारे तांत्रिक बदल, व्यवस्थानातील धोरण आणि एकूणच कामाचा व्याप वाढल्याने कामगार टिकत नाहीत

**पिंपरी | प्रतिनिधी**

औद्योगिकनगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात कुशल कामगारांची मोठी वानवा जाणवत आहे. अंगमेहनतीच्या कामाला नकार, अनेकवर्षे काम करून अपुरे वेतन, कंपन्यांतील बदलणारी धोरणे आणि कामाचा वाढता ताण, अशा अनेक कारणांनी कुशल कामगार कामे सोडून जातात. परिणामी, ऐनवेळी कामगार मिळत नसल्याने परराज्यातून आलेल्या अथवा अकुशल कामगारांकडून कामे करवून घेतली जातात. दुसरीकडे चिखली, कुदळवाडीतील मोठ्या प्रमाणात उद्योग विस्थपित झाल्याने अनेक कामगार आपल्या गावाकडे पतरले आहेत.

कंपनीमध्ये अवजड अथवा हिट ट्रीटमेंट खाली कुशल कामगारांना काम करावे लागते. त्यानंतर पुन्हा घरी परतताना वाहतूक कोंडी, प्रवास आणि त्यातून लागणारा वेळ यामुळे असे काम काही दिवसांनी कामगार सोडून जातात. चाकण, तळेगाव येथील कंपन्यांमध्ये येणारा कुशल कामगार वर्ग हा पिंपरी-चिंचवड परिसरातील आहे. मात्र, एक ते दीड तास लागणार वेळ, वाहतूक कोंडी आणि कामाचा वाढता व्याप हे पाहता कुशल कामारांची संख्या कमी होत आहे.



### व्यवसाय, ऑनलाईन पार्सलच्या कामाला पसंती

» आयटीआय, दहावी पास झाल्यानंतर काही दिवस कंपनीत काम केले जाते. मात्र, अंगमेहनत, आठ तास अडकून पडणे याचबरोबर कामाच्या बदल्यात मिळणार कमी पगार या गणितामुळे अनेकांनी काम सोडून व्यवसाय करण्याकडे कल वाढला आहे. त्यातच लाँड्री, छोटे कंत्राट दुकाने याकडे कल वाढल आहे. तर, सध्या सुरु असलेल ऑनलाईन पार्सल कामात मोठया प्रमाणात पैसे मिळत असल्याने या कामात अशा तरुणांची संख्या वाढली आहे.

### शहरात सुमारे बारा हजार उद्योग

» शहरात दहा ते बारा हजार लहान मोठे उद्योग व्यवसाय आहेत. प्रामुख्याने भोसरी, चाकण, पिंपरी, म्हाळुंगे, तळेगाव, तळवडे, चिखली या भागात काही व्यवसाय आहेत. दरम्यान, कारखान्यांमध्ये होणारे तांत्रिक बदल, व्यवस्थानातील धोरण आणि एकूणच कामाचा व्याप वाढल्याने कामगार टिकत नाहीत. विविध कंपन्यामध्ये राज्याप्रमाणेच परप्रांतिय कामागारांची संख्या मोठी आहे; परंतु काही कंपन्यांमध्ये अवजड कामे करण्यास कुशल कामगार करण्यास तयार होत नाहीत. परिणामी, इतर जिल्ह्यातून अथवा परप्रांतिय तरुणांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. जेणेकरुन कामगारांची संख्या भरुन काढता येईल.

# आंबेगाव पठार परिसरात पाणीटंचाई; महापालिकेकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा

## समस्या सोडविण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून उपाययोजना करण्याची मागणी होत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

आंबेगाव पठार परिसरातील नागरिकांना सध्या पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. बहुतांश सोसायट्यांना महापालिकेकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र, हे पाणी पुरेशे नसल्याने गेल्या दोन आठवड्यांपासून नागरिकांची पाण्यासाठी वणवण सुरू आहे. ही समस्या सोडविण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

धनकवडीलगतच्या आंबेगाव पठार परिसरातील सर्व्हे नंबर 15 आणि 16, आंबेगाव बुद्रुक, दत्तनगर, सिंहगड कॉलेज रस्ता परिसर, शिवसृष्टी परिसरातील भिंताडेनगर आदी भागातील नागरिकांना पुरेशे पाणी मिळत नाही. याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे रहिवाशांनी सांगितले. नव्याने विकसित होत असलेल्या या भागात मोठ्या प्रमाणावर नवीन बांधकामे उभी राहिली आहेत. नागरिकरण झपाट्याने वाढत आहे.



त्यामुळे परिसरातील पाणी समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. भिंताडेनगरमधील आठ ते दहा सोसायट्यांसह चंद्रांगण व कपिल सोसायट्यांना पद्मावती पंपिंग स्टेशनमधून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. शिवसृष्टी, सिंहगड कॉलेज, ज्ञानपीठलगतच्या चिंतामणी रहिवासी सोसायटीत देखील पाण्याची समस्या निर्माण झाली आहे.

आंबेगाव पठार परिसरात काही ठिकाणी दिवसाआड आणि कमी प्रमाणात टँकरने पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. महापालिका प्रशासनाने या भागात टँकरच्या खेपा वाढविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. पद्मावती पाणीपुरवठा केंद्रातून या परिसरासाठी सुमारे 90 ते 100 टँकरच्या खेपा होत आहेत. मात्र लोकसंख्येच्या तुलनेत त्या अपुऱ्या असल्याचे नागरिकांनी सांगितले. सामाजिक कार्यकर्ते सुनील पवार म्हणाले की, परिसरातील नागरिक महापालिकेला लाखो रुपयांचा कर देत आहेत, तरीही त्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. पाण्यासाठी टँकरवर अवलंबून रहावे लागत आहे. प्रशासनाने पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणे आवश्यक आहे.

### नागरिकांकडून आंदोलनाचा इशारा

» आंबेगाव पठार परिसरातील अंतर्गत जलवाहिन्यांचे काम झालेले आहे. मात्र या वाहिन्यांच्या माध्यमातून अद्यापही महापालिकेने पाणीपुरवठा सुरू केला नाही. गेली दोन -अडीच वर्षांपासून यासाठी महापालिकेकडे पाठपुरावा केला जात आहे. प्रसंगी आंदोलनही करण्यात आले आहे. महापालिका आयुक्तांनी लवकरात लवकर पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्यापीही ही समस्या सुटली नाही. जलवाहिन्यांतून लवकरात लवकर पाणीपुरवठा केला नाही, तर नागरिकांच्या वतीने पुन्हा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा माजी नगरसेवक बाळाभाऊ धनकवडे यांनी दिला आहे.

### अजून किती दिवस वाट पाहायची?

» आंबेगाव पठार परिसरातील सर्व्हे नंबर 15 आणि 16 मध्ये जलवाहिन्याटाकण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर पाण्याचा प्रश्न सुटण्याची अपेक्षा नागरिकांना होती. मात्र अद्यापही जलवाहिन्यांतून पाणीपुरवठा करण्यात येत नाही. त्यामुळे अजून किती दिवस पाण्याची प्रतीक्षा करायची, असा सवाल रहिवाशांनी उपस्थित केला आहे.

“ आंबेगाव पठार परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करण्यात येतील. पाणीपुरवठ्याची समस्या लवकरात लवकर सोडवून नागरिकांची गैरसोय दूर केली जाईल.

- तिमैया जगले, प्रभारी सहायक आयुक्त, धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालय

# शासकीय कार्यालय की तळीरामांचा अड्डा?

## खेड पंचायत समितीच्या आवारात दारूच्या बाटल्यांचा खच पडला असून शासकीय कार्यालय की तळीरामांचा अड्डा? अशी परिस्थिती दिसून येत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

खेड पंचायत समितीच्या आवारात दारूच्या बाटल्यांचा खच पडला असून शासकीय कार्यालय की तळीरामांचा अड्डा? अशी परिस्थिती येते दिसून येत आहे. लोकशाहीचे मंदिरात म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात मद्यपान करणाऱ्यांचा सुळसुळाट झाला आहे. पंचायत समितीच्या परिसरात दारूच्या रिकाम्या बाटल्यांचा अक्षरशः खच पडलेला दिसत असून, गट विकास अधिकारी विशाल शिंदे यांच्या कार्यालयाच्या काही फूट अंतरावरच हे चित्र पाहायला मिळत आहे. गट विकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयाजवळ मद्यपानाचा उघडपणे जल्लोष होत असून प्रशासन मूग गिळून गप्प बसले आहे.



स्थानिक नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कार्यालय सुटल्यानंतर रात्रीच्या वेळेस समिती परिसरात काही स्थानिक बेधडकपणे मद्यपान करत बसतात. याचे गांभीर्य म्हणजे, ही सर्व प्रकारची बेशिस्त थेट गट विकास अधिकाऱ्याच्या कार्यालयाजवळ घडते, पण अद्याप यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. प्रशासन झोपेत की सौम्य हेतूने दुर्लक्ष? करीत आहे हेच समजत नाही अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी दिल्या आहेत.

खेड पंचायत समितीच्या आवारात दारूच्या बाटल्यांचा खच पडला असून शासकीय कार्यालय की तळीरामांचा अड्डा? अशी परिस्थिती येते दिसून येत आहे. लोकशाहीचे मंदिरात म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात मद्यपान करणाऱ्यांचा सुळसुळाट झाला आहे शासकीय कार्यालयाच्या आवारात असा प्रकार घडतो आहे, हे अत्यंत लाजिरवाणं आणि निंदनीय आहे. शिस्तबद्ध प्रशासन आणि स्वच्छ कार्यालयीन संस्कृतीची चर्चा करणाऱ्यांना हे दृश्य कितपत शोभेल? या प्रकारामुळे संपूर्ण पंचायत समितीची प्रतिमा मलीन होत असून सामान्य जनतेच्या मनात प्रशासनाविषयी नाराजीचा सूर उमटतो आहे. यावर तात्काळ कारवाई झाली नाही, तर उद्या याच कार्यालयात कायद्याची पायमल्ली ही खुलेआम होईल.

### रात्री मद्यधुंद जल्लोष?

» खेड पंचायत समितीमध्ये दिवसा शासकीय कामकाज आणि रात्री मद्यधुंद जल्लोष ? होत आहे. ही परिस्थिती पाहता खेड पंचायत समिती कार्यालय शासकीय कामासाठी ओळखले जाते की, तळीरामांच्या बेधुंद पार्टीसाठी, असा प्रश्न उपस्थित होतो.

### शासनाचे डोळे कधी उघडणार?

» राजगुरुनगर शहरातील काही कार्यालयाजवळील स्वच्छतागृहा जवळ तळीरांचे अड्डे बनले आहेत. याठिकाणी दिवसा आणि रात्रीच्या वेळी तळीराम दारू पित असतात याकडे प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष आहे. बाटल्यांचा खच पडला असतानाही त्यावर प्रतिबंध करण्याचे शासकीय अधिकाऱ्यांमध्ये धाडस नसल्याने यावरून स्पष्ट होत आहे. बाटल्यांचा खच आणि बेशिस्त यंत्रणा हीच ओळख खेड पंचायत समितीची राहणार का? असा सवाल यानिमित्त उपस्थित झाला आहे.